CMYK

धावत्या गाडीत जातीयवाद चिघळला! ठाण्याच्या महिलेवर हल्ला, विवस्त्र करण्याचा प्रयत्न
>> पान 2

संजय राऊत यांचे बोलणे सामाजिक स्वास्थ्य खराब करणारे
>> पान 3

बारावीच्या परीक्षेचा निकाल ५ मे रोजी जाहीर होणार
>> पान 4

**सुविचार**
दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 260 ■ सोमवार, दि. 05 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




झी मराठीवरील लोकप्रिय मालिका घेणार प्रेक्षकांचा निरोप

आतील पान

# देशाची जशी अपेक्षा तसंच घडणार

## राजनाथ सिंह यांचा पाकिस्तानला इशारा, नवी दिल्लीत मोठं वक्तव्य

**नवी दिल्ली : भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी बक्करवाला आनंदधाम आश्रमात सनातन संस्कृती जागरण महोत्सवात सहभाग घेतला. यावेळी त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरून पाकिस्तानला इशारा दिला. भारतीय सैनिकांच्या साथीने देशांच्या सीमांची सुरक्षा निश्चित करणं ही संरक्षण मंत्री म्हणून माझी जबाबदारी आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात तुम्हाला जे वाटत आहे तसं निश्चित होईल असेही राजनाथ सिंह म्हणाले.**



राजनाथ सिंह यांनी या कार्यक्रमात म्हटले की आपल्या देशाकडे जो वाकड्या नजरेनं बघेल त्यांना सडेतोड उत्तर देणे ही माझी जबाबदारी आहे. तुम्ही सर्व आपल्या पंतप्रधानांना चांगल्या प्रकारे जाणता, त्यांच्या कार्यशैलीशी आपण परिचित आहात. त्यांचं जोखीम उचलण्याचे कौशल्य तुम्हाला माहीत आहे. आपल्या देशाविरोधात जे उभे राहतील त्यांना उत्तर देण्याचे काम ते करतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तुम्ही चांगल्या प्रकारे जाणता त्यांच्या कार्यशैली संदर्भात देखील तुम्हाला माहिती आहे. मला तुम्हाला आश्वस्त करायचे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तुम्हाला जसं वाटतं तसं नक्कीच होईल, असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं

राजनाथ सिंह यांनी बोलताना म्हटले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे लक्ष ठेवलं आहे. विकसित भारताचे स्वप्न त्यांनी देशवासियांपुढे ठेवलं आहे. हे आव्हान छोटं नाही मात्र हे आव्हान नक्कीच पूर्ण होईल.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिष्ठा वाढली हे सर्वांना स्वीकारावं लागेल. यापूर्वी आंतरराष्ट्रीय मंचावर भारताने कुठली गोष्ट मांडली तर भारताला जगभरात गांभीर्याने घेतलं जायचं नाही. तेव्हा भारत कमजोर देश आहे गरिबांचा देश आहे, असं म्हटलं जायचं. मात्र आता आंतरराष्ट्रीय मंचावर भारताने काही भूमिका मांडली तर ती सर्वजण समजून घेतात.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. आत्तापर्यंत अनंतनाग जिल्ह्यात २५ हून अधिक स्थानिक टुरिस्ट गाईडची चौकशी करण्यात आली. सुरक्षा यंत्रणांच्या अंदाजानुसार स्थानिक मदतीशिवाय असा हल्ला होऊ शकत नाही त्यामुळे कसून चौकशी सुरू आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारत जोरदार उत्तर देण्याची तयारी करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही संरक्षण दलाच्या प्रमुखांची चर्चा केलेली आहे आणि भारताच्या संरक्षण सज्जतेचा आढावा घेतला आहे. नरेंद्र मोदी यांनी हल्ल्याचा कट रचणाऱ्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल, असा इशारा दिला होता. भारताकडून पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी देखील केली जात आहे.

## माजी आमदार दिवंगत अरुण जगताप याच्या कुटुंबियांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सांत्वन



**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** माजी आमदार दिवंगत अरुण जगताप यांच्या कुटुंबियांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांत्वन केले. जगताप यांच्या निवासस्थानी भेट देऊन आमदार संग्राम जगताप, सचिन जगताप व कुटूंबातील अन्य सदस्यांचे सांत्वन केले.

यावेळी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, अरुणकाका जगताप यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली असून सामान्यांची घट्ट नाळ जुळलेले कर्तृत्ववान नेतृत्व हरपले आहे. त्यांच्याशी अत्यंत निकटचे संबंध होते. सर्वांना सोबत घेऊन अत्यंत चोखपणे काम करण्याचा त्यांचा कटाक्ष होता. जगताप कुटुंबियांना हे दु:ख सहन करण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना करत त्यांचे अपूर्ण काम पूर्णत्वास नेणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

## जनरेटिव्ह 'एआय'मुळे मीडिया व्यवसायात परिवर्तन घडेल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मीडिया व्यवसाय आता केवळ माहिती किंवा करमणुकीपुरता मर्यादित न राहता अत्याधुनिक डिजिटल अनुभव देणाऱ्या उद्योगात परिवर्तित झाला आहे. जनरेटिव 'एआय'मुळे मीडिया व्यवसायात परिवर्तन झाले असून 'एआय' ही केवळ कल्पना नसून व्यवसायासाठी उपयुक्त ठरणारी वस्तुस्थिती असल्याचे मत जनरेटिव्ह एआय संदर्भातील चर्चासत्रात व्यक्त करण्यात आले. जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये वेव्हज-२०२५ समिटमध्ये वेव्हजएक्समध्ये जनरेटिव्ह 'एआय' स्टार्टअप व्यवसायाचे आणि चए (मीडिया आणि मनोरंजन) स्टार्टअपचे रेप द्वारे स्केलिंग या विषयावरील चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते.

## जागतिक सृजनशील सहयोगात भारताचे एक अभूतपूर्व पदार्पण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेच्या (वेव्हज) छत्राखाली आयोजित केलेल्या या बाजारपेठेत चित्रपट, संगीत, रेडिओ, व्हीएफएक्स आणि ॲमेशन क्षेत्रात ८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक व्यावसायिक व्यवहार नोंदवले गेले. करार करण्याचे काम अजूनही सुरू असताना, काही दिवसांत एकूण मूल्यांकन १००० कोटी रुपयांहून जास्त होण्याचा अंदाज आहे.

वेव्हज बाजारामुळे ५०० कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळाले आणि येत्या काळात अतिरिक्त करार पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. ८०-आसन व्यवस्था असलेल्या स्थानी झालेल्या चित्रपटांच्या क्युरेटेड स्क्रीनिंगला उत्साही प्रतिसाद मिळाला आणि निवडक चित्रपटांना दाद मिळाली. बाजाराने उदयोन्मुख निर्मात्यांना त्यांचे आयपी खरेदीदार आणि सहयोगींच्या जागतिक नेटवर्कमध्ये सादर करण्यास मदत केली, ज्यामुळे लक्षणीय औत्सुक्य निर्माण झाले आणि नवीन भागीदारी वाढली.

## पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान, बिलावल भुट्टो यांचे एक्स अकाउंट भारतात ब्लॉक, केंद्र सरकारची कारवाई

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची चहुबाजूने कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने बंदी घातली आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.



पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढल्यानंतर भारताकडून अनेक पावलं उचलले जात आहेत. एवढंच नाही तर अनेक पाकिस्तानी कलाकारांचे सोशल मिडिया अकाउंट्सवर देखील भारतात बंदी घालण्यात आली आहे. तसेच पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे युट्यूब चॅनल देखील भारतात बंद करण्यात आले आहे.

यानंतर आता पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि माजी मंत्री बिलावल भुट्टो यांचे एक्स अकाउंट देखील भारतात ब्लॉक करण्यात आले आहेत. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, भारत सरकारने यापूर्वी माहिरा खान, हानिया आमिर आणि साजल अली अशा अनेक प्रसिद्ध पाकिस्तानी कलाकारांच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर बंदी घातलेली आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला भारताने भारताविरुद्ध प्रक्षोभक, संवेदनशील सामग्री आणि चुकीची माहिती पसरवल्याबद्दल १६ पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवरही बंदी घालण्याचा निर्णय घेतलेला आहे.

शाहबाज शरीफ यांचं युट्यूब चॅनलही भारतात बंद

जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. त्यामुळे भारताने पाकिस्तान विरोधात कठोर भूमिका घेतली आहेत. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचंही युट्यूब चॅनल भारतात बंद करण्यात आलं आहे. त्यानंतर आज पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि माजी मंत्री बिलावल भुट्टो यांचे एक्स अकाउंट देखील भारतात ब्लॉक करण्यात आलं आहे, भारत सरकारने ही कारवाई केल्याची माहिती सांगितली जात आहे.

## भारताचा पाकिस्तानवर वॉटर स्ट्राईक सुरूच, आता बागलीहार धरणातून चिनाबचे पाणी थांबवले

नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवण्यासाठी सर्व बाजूंनी मुस्कटदाबी सुरू केली आहे. सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर वुलर सरोवराचे पाणीही पाकिस्तानसाठी बंद केले. आता त्यापुढे जाऊन चिनाब नदीवर असलेल्या बागलीहार प्रकल्पाचे पाणी अडवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पाकिस्तानसाठी आणखी एक धक्का असल्याचं सांगितलं जातंय.

जम्मू-कश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. भारताने सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर आता चिनाब नदीचे पाणी बागलीहार धरणाद्वारे रोखण्याचा निर्णय घेतला आहे.

बागलीहार धरणातून पाणी अडवले

भारताने जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयानंतर ही कारवाई केली आहे. या हल्लयात २६ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर भारताने १९६० पासून सुरू असलेली आणि जागतिक बँकेच्या मध्यस्थतेत झालेली सिंधू पाणी वाटप करार रद्द केला आहे.

जम्मूच्या रामबनमध्ये असलेल्या बागलीहार प्रकल्पातील पाण्याचे वहन नियंत्रित करण्याची भारताकडे क्षमता आहे. तसंच, झेलम नदीवर असलेल्या किशनगंगा प्रकल्पासंदर्भातही भारत लवकरच कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

बागलीहार धरण हा भारत आणि पाकिस्तानमधील अनेक वर्षांपासूनचा वादाचा मुद्दा आहे. पाकिस्तानने यापूर्वीही याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषत: जागतिक बँकेकडे मध्यस्थतेची मागणी केली होती.

# पाकिस्तानविरुद्ध कारवाईची तयारी? नौदल प्रमुखांनंतर आता हवाई दल प्रमुखांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली :** २२ एप्रिलला जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. भारत आणि पाकिस्तानमध्य सध्या तणावाची स्थिती आहे. याच पार्श्वभूमीवर, एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यामध्ये हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पाकिस्तानसोबतच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. शनिवारी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांनी पंतप्रधानांची भेट घेतली होती.

शनिवारी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी पंतप्रधान मोदींची त्यांच्या लोक कल्याण मार्गावरील निवासस्थानी भेट घेतली होती. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर हवाई दल प्रमुख आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील ही बैठक झाली. त्या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण प्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान आणि तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख उपस्थित होते. त्या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल देखील उपस्थित होते.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या एक दिवसानंतर सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची (सीसीएस) बैठक झाली. या हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सरकारने दहशतवादाचा नाश करण्याच्या भारताच्या राष्ट्रीय संकल्पाचा पुनरुच्चार केला आहे. दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना आणि कट रचणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल असा इशारा सरकारकडून देण्यात आला आहे. सरकारने सशस्त्र दलांना पूर्ण ''ऑपरेशनल स्वातंत्र्य'' दिले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. दहशतवाद्यांवर सरकारने केलेल्या कोणत्याही कारवाईला विरोधी पक्षांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे. सीसीएसला माहिती देताना सांगण्यात आले की दहशतवादी हल्ल्याचे



सीमेपलीकडे संबंध आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील यशस्वी निवडणुका आणि आर्थिक विकासाच्या दिशेने प्रगती झाल्यानंतर हा हल्ला झाल्याचे बोलले जात आहे. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला कडक संदेश देण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. यामध्ये सिंधू पाणी करार स्थगित करणे देखील समाविष्ट आहे.

CMYK

## जात निहाय जनगणना

मागील आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. या संबंधीची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत केल्यानंतर संपूर्ण देशातून जात निहाय जनगणनेचे स्वागतच करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांसह अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह विरोधकांकडून सातत्याने जात निहाय जनगणनेची मागणी होत होती. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. उशिरा का होईना पण पण जात निहाय जनगणनेला मंजुरी देऊन सरकारने एक चांगला निर्णय घेलता आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच जात निहाय जनगणना होतेय हे विशेष याआधी इंग्रजांच्या काळात १८८१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत जातींची गणना झाली होती. १९४१ च्या जनगणनेत देखील जातींची गणना करण्यात आली होती पण त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नव्हती. १९५१ साली स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा जनगणना झाली या जनगणनेत जात निहाय जनगणना व्हावी अशी मागणी झाली होती मात्र तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी त्यास नकार दिला त्यांच्या मते जात निहाय जनगणनेमुळे जातिजातीत विभाजन होऊन राष्ट्रीय एकतेला बाधा पोहचू शकते त्यामुळे त्यांनी जात निहाय जनगणेस नकार दिला होता. मात्र या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली तशी ती प्रत्येक जनगणनेत करण्यात आली कारण अनुसूचित जाती जमातींची जनगणना व्हावी असे घटनेतच नमूद करण्यात आले आहे. अनुसूचित जाती जमातींची गणना जनगणनेत केली जाते मात्र इतर मागासवर्गीय जातींची गणना करण्यात येत नव्हती ती आता करण्यात येईल. जात निहाय जनगणना हा एक चांगला निर्णय आहे. जात निहाय जनगणना झाल्याने सर्व जातींची लोकसंख्या मोजण्यात येईल त्यामुळे कोणत्या जातींची किती लोकसंख्या आहे ते समजेल. १९३१ साली झालेल्या जनगणनेत मागासवर्गीय जातींची लोकसंख्या ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले होते. मंडल आयोगाने इतर मागास वर्गाला आरक्षण देताना हीच लोकसंख्या ग्राह्य धरून इतर मागास वर्गाला २७ टक्के आरक्षण दिले होते. इतर मागास वर्गाची लोकसंख्या यापेक्षा अधिक आहे त्यामुळे २७ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण मिळायला हवे अशी मागणी इतर मागास वर्गाकडून होऊ लागली होती. आता जात निहाय जनगणना झाल्यामुळे सर्व जातींची लोकसंख्या मोजली जाईल त्यामुळे या वर्गाची नाराजी दूर होईल. जात निहाय जनगणना झाल्याने आरक्षणाची जी ५० टक्के मर्यादा आहे ती देखील वाढवली जाईल. सध्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे. जात निहाय जनगणनेमुळे संसद आणि विधान सभेचे चित्रही बदलू शकते. शिवाय जात निहाय जनगणना झाल्यावर प्रत्येक जातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल. जात निहाय जनगणनेमुळे प्रत्येक जातीची शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता येईल. या आकडेवारीत स्पष्टता आल्यावर सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल एकूणच जात निहाय जनगणना ही देशाच्या सामजिक आणि आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी ठरेल. आता प्रश्न असा आहे की ही जात निहाय जनगणना होणार कधी ? जात निहाय जनगणने संदर्भातील विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. म्हणजेच सप्टेंबर पासून जात निहाय जनगणनेची प्रारंभिक प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र प्रत्यक्ष जात निहाय जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. २०२१ सालीच ही जनगणना व्हायला हवी होती मात्र कोरोणामुळे ती पुढे ढकलण्यात आली आता ती पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. जनगणना ही दर दहा वर्षांनी होते. जनगणना ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्यक्ष जनगणनेचे काम जरी काही महिनेच असले तरी त्यातून येणाऱ्या आकडेवारीचे प्रामाणिकिकरण आणि प्रकाशनासाठी एक दोन वर्ष लागतात म्हणजेच या जात निहाय जनगणनेची आकडेवारी २०२७ सालीच हाती येईल. या जात निहाय जनगणानेसाठी सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल.

# धावत्या गाडीत जातीयवाद चिघळला! ठाण्याच्या महिलेवर हल्ला, विवस्त्र करण्याचा प्रयत्न

**पालघर/प्रतिनिधी :** हातामध्ये असणाऱ्या रुद्राक्ष माळेच्या अनुषंगाने पश्चिम रेल्वेवरील अवंतिका एक्सप्रेस मध्ये सुरू झालेला वाद चिघळून ठाणे येथील एका महिलेवर अल्पसंख्यांक समाजाच्या महिलेने व एका सहकारी प्रवासी पुरुषांने धारदार वस्तूने वार केला. तिच्याभोवती अल्पसंख्यांक समाज बांधवांनी कडे (रिंग) निर्माण करून या महिलेला मारहाण व हल्ला करण्यात आला. हेल्पलाइनला फोन केल्यानंतर या महिलेला वलसाड येथे उतरवण्यात आले व उपचार केल्यानंतर पालघर रेल्वे पोलिसात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

३ मे रोजी आपल्या इंदोर येथे शिकत असलेल्या मुलाला घरी आणण्यासाठी ठाणा येथील रहिवासी ॲड. शितल शरद भोसले या अवंतिका एक्सप्रेसमधून सामान्य डब्यातून प्रवास करत निघाल्या होत्या. या सामान्य डब्यात बहुतांश सहप्रवासी अल्पसंख्यांक असल्याचे माहिती पीडित महिना हिने दिली आहे.

ही गाडी विरारच्या पलीकडे आल्यानंतर ॲड.शितल भोसले यांच्या हातात असलेली रुद्राक्ष माळ व छत्रपतींचे नाव पाहून शेजारी बसलेल्या एका अल्पसंख्याक महिला प्रवासाने वाद-विवाद सुरू केला.

''आप ये रुद्राक्ष पेहेनते हो क्या बकवास हैं,'' असे सांगितल्यावरून वाद सुरू झाला व पीडित महिलेने, ''तुझ्या बुरख्याचा मला त्रास होतो असं मी म्हटलं का, मग तुला माझ्या माळांचा त्रास का होतो'' अशी बोलाबाली होत वाद चिघळला.

अवंतिका एक्सप्रेस विरार रेल्वे स्थानक सोडल्यानंतर सुरू झालेल्या वादाचे रूपांतर हल्ल्यात झाले व पालघर रेल्वे स्टेशन गाडी ओलांडण्याच्या स्थितीत ॲड. शितल भोसले यांच्यावर धारदार वस्तूने सरळ वार केल्याची या



महिलेने तक्रार नोंदवली आहे. या हल्ल्यात अल्पसंख्यांक महिलेला मानेवर वार करायचा होता, पण तो चुकवण्यास एड. शितल भोसले यांना यश लाभले. या हल्ल्यात त्यांच्या हातावर हल्ला झाला.

ही गाडी वापी स्टेशनला थांबली असताना या महिलेने फलाटावर असणाऱ्या होमगार्ड याला मदतीसाठी साद घातली. मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद लाभला नाही असे त्या महिलेने पालघर येथील नागरिकांना सांगितले. दरम्यान या संदर्भात हेल्पलाइनवर तक्रार नोंदवण्यात आल्याने वलसाड रेल्वे स्थानकात पीडित महिलेला तसेच हल्ला करणाऱ्या एक महिला व पुरुष प्रवासाला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले. या महिलेवर उपचार करून तक्रार नोंदवण्यासाठी तिला आज सकाळी नऊ वाजता पालघर रेल्वे स्थानकात आणून रेल्वे पोलिसांमार्फत तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणात रेल्वे लोहमार्ग चे पोलीस अधीक्षक पालघर येथे येणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

घेराव टाकून विवस्त्र करण्याचा प्रयत्न?

या जातीयवाद विवादामध्ये डब्यातील अल्पसंख्यांक समाजाचे बांधव एकत्र होऊन त्यांनी या महिलेला घेरले. दरम्यान पिडीत महिलेला हल्ला करणाऱ्या महिलेकडून विवस्त्र करण्याचा प्रयत्न देखील करण्यात आल्याचे आरोप पीडित महिलेने केले आहे. हा हल्ला सुरू असताना कोणालाही व्हिडिओ चित्रीकरण अथवा छायाचित्र काढण्यावर मज्जाव करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

शहर पोलिसांचा बंदोबस्त

या घटनेची माहिती मिळताच हिंदू समाजाशी संबंधित विविध घटकांचे प्रतिनिधी या ठिकाणी गोळा झाले असून रेल्वे स्टेशन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठी पालघर शहर पोलिसांची मदत घेण्यात आली असून पोलिसांचा मोठा फौजफाटा बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आला आहे.

# पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानचा पर्दाफाश; आता काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला, डोनाल्ड ट्रम्पकडे याचना

नवी दिल्ली: जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. दरम्यान, अमेरिकेतील पाकिस्तानचे राजदूत रिझवान सईद शेख यांनी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे की, काश्मीरचा वाद हा भारत-पाकिस्तान संबंधांच्या मुळाशी आहे आणि तो सोडवणे हा तणाव कमी करण्याचा एकमेव मार्ग आहे. या दरम्यान, त्यांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला हा ''परमाणु फ्लैशप्वाइंट'' सोडवण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे आवाहन केलंय. भारत-पाकिस्तान युद्धामुळे 'अणुशस्त्र' पर्यायनिर्माण होऊ शकतो, हे शेख यांचे विधान राजकीय दबाव निर्माण करण्याचा तसेच आंतरराष्ट्रीय समुदायाला या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास भाग पाडण्यासाठी धोरणात्मक भीती निर्माण करण्याचा प्रयत्न असू शकतो. विषकांचा असा विश्वास आहे की पाकिस्तानकडून अनेकदा जागतिक लक्ष वेधण्यासाठी अशी विधाने केली जातात, परंतु ही परिस्थिती संवेदनशील आहे आणि जर हे शब्द कूटनीतीचा भाग असले तरी त्यांचे परिणाम खूप गंभीर असू शकतात. असेही सांगितलं जातंय.

रिझवान सईद शेख पुढे म्हणाले की, जेव्हा जेव्हा काश्मीरमध्ये तणाव निर्माण होतो तेव्हा जगाचे लक्ष त्याकडे जाते, परंतु काही काळ शांतता होताच जग त्याकडे डोळेझाक करते. त्यांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. मात्र असे असले तरीही पाकिस्तानची ही एक जुनी रणनीती आहे. ज्यामध्ये पाकिस्तान भारतावर आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र, अमेरिका आणि इतर देशांसमोर काश्मीरचा मुद्दा उपस्थित करतो.

## झी मराठीवरील लोकप्रिय मालिका घेणार प्रेक्षकांचा निरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** झी मराठीच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. तुमच्या आवडत्या मालिकांमध्ये लवकरच काही बदल होणार आहेत! टीआरपीच्या खेळात काही मालिका नवीन रंगत आणणार आहेत, तर काही जुन्या मालिकांना प्रेक्षकांचा निरोप घ्यावा लागणार आहे. गेल्या वर्षी १८ मार्च २०२४ रोजी सुरू झालेली नवरी मिळे हिटलरला ही मालिका लवकरच प्रेक्षकांना गुड बाय म्हणणार आहे!

या मालिकेने अभिनेता राकेश बापट आणि अभिनेत्री वल्लरी विराज या फ्रेश जोडीला छोट्या पडद्यावर आणलं आणि पहिल्या दिवसापासूनच या जोडीला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर उचलून धरलं. एजे आणि लीलाची केमिस्ट्री तर इतकी हिट झाली की, २०२४ च्या झी मराठी पुरस्कार सोहळ्यात या मालिकेने अनेक पुरस्कारांवर आपली मोहोर उमटवली! पण आता ही लोकप्रिय मालिका सर्वांचा निरोप घेणार आहे.

मागील काही दिवसांपासून नवरी मिळे हिटलरला मालिका बंद होणार असल्याच्या चर्चा जोर धरत होत्या. मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारणाऱ्या सानिका काशीकर हिनेही तिच्या इंस्टाग्राम स्टोरीमधून या बातमीला दुजोरा दिला होता. आणि आता, मालिकेतील आणखी एक महत्त्वाचा चेहरा, म्हणजे भूमिजा पाटील हिने नुकताच एक व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओचं थंबनेल वाचूनच चाहत्यांच्या काळजाचा ठोका चुकला! थंबनेल होतं - ''सेटवरचे अखेरचे काही दिवस...!'' या व्हिडिओमुळे आता हे स्पष्ट झालं आहे की एजे आणि लीलाची ही रोमँटिक कहाणी लवकरच संपणार आहे.

भूमिजाने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये सेटवरची मजा-मस्ती, कलाकारांमधील गप्पागोष्टी आणि शेवटच्या काही दिवसांमधील आठवणी दिसत आहेत. विशेष म्हणजे, मालिकेच्या एका खास चाहतीने सेटला भेट दिली आणि सगळ्या कलाकारांसाठी एक सुंदर कविता लिहिली! त्या चाहतीने आपल्या कवितेतून मालिकेच्या टीमला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ती म्हणाली, ''बरोबर वर्षाभराआधी एका नव्या मालिकेचे काही क्युट प्रोमो आम्ही पाहिले. ते प्रोमो पाहून मनात एक वेगळीच उत्सुकता निर्माण झाली होती. मालिकेचं वेगळं नाव आणि याची आगळीवेगळी प्रेमकथा सर्वांसाठी लक्षवेधी ठरली. मुख्य हिरो-हिरोईनची केमिस्ट्री एकदम जबरदस्त होती. एक रागीट हिरो आणि चंचल, सतत उत्सुकता असणारी हिरोईनया दोघांच्या प्रेमाचा प्रवास एकदम क्रेझी होता. या मालिकेच्या संपूर्ण टीमला खूप-खूप शुभेच्छाकारण, ही फक्त सुरुवात आहे अजून खूप प्रवास बाकी आहे

# भाजपच्या माजी नगरसेवकाच्या आजी-माजी समर्थकांमध्ये छोट्या तलवारी, लोखंडी रॉडने तुंबळ हाणामारी; डोंबिवलीतील घटना, ४ जखमी

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी :** डोंबिवलीमध्ये काल (शनिवारी) रात्रीच्या सुमारास डोंबिवली पश्चिमेकडील राजू नगर परिसरात भाजपच्या माजी नगरसेवकाच्या आजी-माजी समर्थकांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांच्या आजीमाजी समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला. तलवारी, लोखंडी रॉड, दगडांनी दोन्ही गटाकडून मारहाण करण्यात आली आहे. या राड्यात तीन ते चार जण जखमी झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी विष्णू नगर पोलीसानी दोन्ही गटांनी दिलेला तक्रारीनुसार दोन्ही गटांविरोधात गुन्हे दाखल करत तीन जणांना अटक केली आहेत. याप्रकरणी विष्णू नगर पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. भाजप नगरसेवकांच्या आजी-माजी समर्थकांमध्ये झालेल्या या राड्यामुळे डोंबिवलीत एकच खळबळ उडाली आहे.

नेमकं काय घडलं?

काल (शनिवारी) दुपारच्या सुमारास भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे हे कामानिमित्त एका बिल्डरच्या ऑफिसमध्ये गेले होते. यावेळी त्याठिकाणी मेघराज तुपांगे आले. तुपांगे आणि म्हात्रे यांचे सुरक्षारक्षक यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. याप्रकरणी या सुरक्षा रक्षकाने विष्णू नगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. मेघराज तुपांगे हे काही वर्षापूर्वी भाजप नगरसेवक विकास म्हात्रे यांच्या समर्थक होते. मात्र काही कारणावरून दोघांमध्ये वितुष्ट निर्माण झाले आहेत. काल रात्रीच्या सुमारास मेघराज तुपांगे आणि त्याच्या साथीदारांचा विकास म्हात्रे यांचे समर्थक प्रमोद चव्हाण आणि महेश चव्हाण यांच्यात पुन्हा जोरदार राडा झाला.

त्याचबरोबर पुन्हा रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास विकास म्हात्रे यांचे समर्थक प्रमोद चव्हाण, महेश चव्हाण मित्रा बरोबर गप्पा मारत असताना मोटर सायकलवरून आलेल्या मेघराज तुपांगे, उमेश भोईर, शत्रुघ्न भोईर, विशाल म्हात्रे, अशोक म्हात्रे यांच्यासह आणखी काही अनोळखी व्यक्ती हातात छोट्या तलवारी, लोखंडी रॉड घेऊन आले. तिथे येताच गप्पा मारणाऱ्या चव्हाण यांच्यासह इतरांना बेदम मारहाण केल्याची तक्रार अजय गोलतकर यांनी विष्णूनगर पोलीस ठाण्यात केली. तर आपण दुचाकीवरून घरी परतत असताना प्रमोद चव्हाण यांच्यासह चौघांनी अंधारात आपला रस्ता अडवून आपल्यावर धारदार हत्याराने हल्ला करत आपल्यासह इतरांना जखमी केल्याची तक्रार मेघराज तुपांगे यांनी केली आहे. या दोन्ही तक्रारीवरून पोलिसांनी परस्पर विरोधी गुन्हे दाखल करत अजय गोलतकर याच्यासह विरोधी गटातील शत्रुघ्न मढवी, विशाल म्हात्रे, अशोक म्हात्रे, या चौघांना अटक केली आहे. तर या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या प्रमोद चव्हाण आणि महेश चव्हाण याना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत .

# वैतरणा धरणावर एल्गार कष्टकरी संघटनेचा आक्रमक आंदोलनात्मक पवित्रा

दैनिक आपला विदर्भ

**इगतपुरी/प्रतिनिधी :** इगतपुरी तालुक्यातील वैतरणा धरणावर आज एक आक्रमक आणि थरारक आंदोलन घडून आलं. मुंबईला होणारा पाणीपुरवठा रोखण्यासाठी एल्गार कष्टकरी संघटनेचे पदाधिकारी आणि महिलांनी धरण परिसरात जोरदार आंदोलन छेडले. महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असलेलं हे आंदोलन अचानक तीव्र झालं, जेव्हा संघटनेच्या महिला आणि कार्यकर्त्यांनी थेट वैतरणा धरणाच्या मुंबईकडे जाणाऱ्या कॅनलमध्ये उड्या मारल्या.

हा धक्कादायक प्रकार घडताच प्रशासनालाही भान आलं, आणि जलसंपदा विभागाने तत्काळ कॅनलमधून मुंबईकडे जाणारा पाणीपुरवठा थांबवण्याचा निर्णय घेतला. संघटनेचा आरोप



आहे की, आदिवासी पाड्यांना अजूनही शुद्ध आणि पुरेसं पाणी मिळत नाही. वारंवार निवेदने देऊनही स्थानिक जलसमस्या तसेच जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये अपारदर्शकता आणि दिरंगाई असल्याची तक्रार संघटनेने केली आहे. ''जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील,'' असा ठाम पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे. इतकंच नव्हे, तर मागण्या मान्य न झाल्यास वाहत्या पाण्यात उड्या टाकण्यास भाग पाडलं जाईल, अशी तीव्र चेतावणी आंदोलकांनी दिली आहे.

सध्या धरण परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच एल्गार कष्टकरी संघटनेचे पदाधिकारी आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा सुरू आहे. प्रशासनाकडून समाधानकारक तोडगा निघतो का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# संजय राऊत यांचे बोलणे सामाजिक स्वास्थ्य खराब करणारे

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची टिका

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** संजय रावतांना टीकाटिपणी करण्या व्यतिरिक्त काही येत नाही. उद्धव ठाकरे यांच्या लोकांनी वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकचा विरोध करून, अशा लोकांना पाठिंबा दिला ज्यांना आनंद होतो. ज्या पद्धतीने संजय राऊत बोलत आहे, त्यांना मोदीजी अजून समजतच नाहीत, ते समजायला वेळ लागेल.नरेंद्र मोदी समजायला उद्धव ठाकरे, संजय राऊत आणि त्यांच्या पिलावळांना वेळ लागेल.अशी टिका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

यावेळी ते म्हणाले की, नरेंद्र मोदी कोणालाही धक्का न लागू देता पाकिस्तानचा आणि नक्षलवाद्यांचा बिमोड करतील. संजय राऊत यांच्या तिथवणी खोर वक्तव्यावर येऊ नका. ते इंटरनल सामाजिक स्वास्थ खराब करतात. संजय राऊत यांचे रोजचं बोलणं सामाजिक स्वास्थ्य खराब करणार आहे. पंतप्रधान देशातील १४० कोटी लोकांना सुरक्षित ठेवण्याचे काम करत आहेत. संजय राऊत आता काँग्रेसमय झाले आहेत. त्यांनी काँग्रेसचे संविधान स्वीकारले, त्यामुळे ते काँग्रेसची भाषा बोलतात.माजी मुख्यमंत्री सत्कार कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांची अनुपस्थिती ही एकनाथ शिंदे त्या कार्यक्रमाला गेले नाहीत कदाचित त्यांना इतर महत्त्वाचं संघटनात्मक कार्य असेल. किंवा एवढी चार-पाच खाते आहेत. त्यातील काही महत्त्वाचं काम असेल. महायुती प्रचंड मजबूत आहे, कुठेही बेबनाव निर्माण झाला नाही. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार तिघेही भावासारखा काम करतात. मी त्याचा साक्षी आहे हे तयार केलेले चित्र आहे. असं चित्र तयार करून, महाराष्ट्रात विचित्र वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

संजय शिरसाट काय म्हणाले मला माहिती नाही, मला माहिती घ्यावी लागेल. लाडकी बहीण योजनेचा म्हणायचे झाले तर, एखादी योजना जेव्हा आपण राज्य म्हणून चालू करतो, तेव्हा ती योजना राज्याने चालवायची असते. खाती वेगवेगळी असली तरी, जेव्हा सामूहिक निर्णय होतो, तेव्हा ते निर्णय सर्वच खात्यांना बंधनकारक असतात. सर्व समाजाच्या सर्व धर्माच्या लाडक्या बहिणी आहेत. त्यामुळे थोडा थोडा कॉम जर घेतला असेल. मी संजय शिरसाठ यांच्याशी चर्चा करेन. अजित पवारांना एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री व्हायचंय तर, आपापला पक्ष वाढवण्याची त्यांना मुभा आहे.




आम्ही सरकार म्हणून तिघे एकत्र आहोत. ही पक्ष संघटनेची भावना आहे, भावना व्यक्त करायला काय हरकत आहे. राज्यामध्ये अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत.

पक्ष वाढवण्यासाठी काही भूमिका मांडाव्या लागतात. त्या मांडल्या तर त्यात काय हरकत आहे. विकास करत असताना काही जमिनी संपादित कराव्या लागतात. पुरंदर विमानतळ हे इंटरनॅशनल पुणे बनवण्याचा एक महत्त्वाचे स्थान आहे.पुरंदर विमानतळाचं डिझाईन तुम्ही बघाल, तर, तुमच्यासारखा पत्रकार आणि संपादकही म्हणेल ते विमानतळ झालंच पाहिजे, यामध्ये काही प्रश्न असतील, तर त्यांनी माझ्याजवळ मुख्यमंत्र्यांजवळ किंवा अजित पवारांसमोर मांडावे. शेतकऱ्यांवर लाठी चार्ज होणे, त्यांचा जीव जाणे हे मान्य नाही. त्यांचे काही प्रश्न असतील, तर ते सोडवण्याचा मी प्रयत्न करेल. गरज पडली तर मुख्यमंत्र्यांकडे पण जाईल.असे मत यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

# इगतपुरी तालुक्यातील आंबेवाडी शिवारात भीषण पाणीटंचाई

**दैनिक आपला विदर्भ**

**इगतपुरी/प्रतिनिधी :** इगतपुरी तालुक्यातील आंबेवाडी शिवारात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून पाझर तलाव आटले असल्याने तलावातील एका कोपऱ्यात पाझरणाऱ्या झिऱ्यातून आदिवासी महिला भगिनींना पाणी भरावे लागत आहे. आंबेवाडी शिवारात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने एका हंडा भरण्यासाठी २० मिनिटे लागत आहेत. पाणी भरल्यावर खडकाळ व अरुंद पाय वाटेने टेकडी चढत पाणी न्यावे लागत आहे.जवळ जवळ एक ते दीड किलोमीटरचा कपारीतून पायपीट करत पाणी भरावे लागत आहे.अनेकदा महिला पाणी वाहत असताना पडून जखमी झाल्याच्या घटना घडल्या असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले आहे. जलजीवन मिशन ची टाकी आणि पाइपलाइन आहे, मात्र नियोजनाअभावी त्यातही अजून पाणी नाही.



### प्रशासनाने पाण्याची व्यवस्था करावी

आंबेवाडी शिवारात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असताना प्रशासनाने या पाणीटंचाईवर तात्काळ उपाययोजना करण्याची गरज आहे. महिलांची पाहण्यासाठी रानोमाळ पायपीट होत आहे.पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असून माझा प्रशासनाने याकडे लक्ष देऊन पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक महिला गीता केकरे यांनी केली आहे.

# पाकिस्तानला धडा शिकवा, आम्ही सोबत आहोत

## आमदार जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषद

**दैनिक आपला विदर्भ**

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** काश्मिरी लोकांनी आपला जीव धोक्यात घालून दहशतवादी हल्ल्यातून नागरिकांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. तिथे एकही सैनिक का नव्हते?हा मोठा प्रश्न आहे. हे धक्कादायक, हे केंद्र सरकारचं अपयश आहे.प्रश्न विचारणाऱ्यालाच ताब्यात घेतलं जात आहे. जबाबदारीवर कोणी बोलायला तयार नाही.पाकिस्तानला जो काही धडा शिकवायचा आहे, तो शिकवा आम्ही सोबत आहोत.असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



यावेळी ते म्हणाले की, सैनिकांची संख्या कमी का, यावर कोणी बोलत नाही. सैनिकांना पेन्शन दिली जात नाही. जनतेपासून काहीतरी लपवून ठेवतं, द्वेषाचं राजकारण सुरू आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुस्लिम सैनिक होते. केळशीतील मुस्लिमला ७०० एकर जमीन शिवाजी महाराजांनी दिली. शिवाजी महाराजांचे शौर्य अफजलखानाची कबर सांगते, ही गणिमी काव्याची ओळख आहे. राज्याभिषेकाला विरोध करणार्यांची पिलावळ आता महाराष्ट्रात वावरताहेत. भाजप अचानक जातगणनेला तयार का झाली?हा प्रश्न उपस्थित होत आहे. न्यायव्यवस्थेतही आरक्षण करा.भाजप कायम निवडणुकांचा विचार करतात. बिहारमध्ये ६३ टक्के ओबीसी समाज आहे. ईव्हीएम प्रमाणे जातीय जनगणनेत हेराफेरी झाली. तर, सगळंच संपेल.

काश्मिरमध्ये सैनिक का नव्हते, याचं उत्तर सरकारला द्यावं लागेल. पराभवाने कोणताही पक्ष संपत नाही, आमच्यासाठी कार्यकर्त्यांना लढण्यासाठी तयार करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. आता ही सिस्टीम सुरू झालीय, सगळ्या फाईली उचलायच्या आणि मंत्रालयात पाठवायच्या, टक्केवारी पोहचविणारे दलाल सकाळची गाडी पकडून मंत्रालयात जातात, कुठल्यातरी बंगल्यात डिपॉझिट केले की झाली कामं, ही सिस्टीम सुरू झालीय.शरद पवार यांनी राजीनामा का मागितला नाही, याचं उत्तर मी काय देऊ, त्यावर मी काय बोलणार? संजय राऊत मोठा माणूस आहे.मी जे काही बोलायचं ते बोललो आहे.

शरद पवार यांच्याबाबतीत मी काय बोलू? पण हल्ल्याची जबाबदारी घेतली पाहिजे, विलासराव देशमुख, शिवराज पाटील यांनी जबाबदारी घेऊन राजीनामे दिले होते. संजय राऊत यांना पुस्तक प्रकाशनाबद्दल शुभेच्छा, चांगली गोष्ट आहे.२००४ चं काय मला आठवत नाही, एवढी माझी मेमरी स्ट्राँग नाही. स्वप्न पाहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण स्वप्न पूर्ण होईल की नाही याचीही जाणीव असावी, अजित पवारांना वाटत असेल तर चुकीचं काय आहे. सामना अग्रलेख आम्ही केंद्र सरकारसोबत. युद्ध होईल का नाही हे नाही माहिती, २ लाखांनी सैन्य कमी होईल हे परवडेल का? त्यांना चुनचून करून मारू द्या किंवा निवडून मारू द्या आम्ही सरकार सोबत आहोत. पण हिंदू-मुस्लिम केले जात असून, मुख्य मुद्दे बाजुला सारले जात आहेत. स्वतः चं राजकीय अपयश झाकण्यासाठी हिंदू-मुस्लिम असे कोंबडे झुंजवले जात आहेत.जनसुरक्षा कायद्याने हे राज्य पोलिसी राज्य होईल,तुमचं स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे काम होईल. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### यावर्षी १०३ टक्के पाऊस पडेल असा अंदाज उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर पाणी टंचाई निर्माण झाली आहे. पाणी टंचाईबाबत विभागीय आयुक्तांना आयुक्तांना सुभेदारी विश्रामगृह येथे बोलावले आहे. अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, मी शेतकरी आहे. शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आलो. मला झाडाची खूप आवड आहे. पर्यावरणाचा यक्ष प्रश्न असल्याने, देशी झाड लावले पाहिजे. जनसंयोगी ग्रुप जे काम करतो, त्यांना प्रोत्साहन दिले पाहजे. मी झाडांची माहिती घेतली आहे. निसर्ग जेव्हा तयार झाला तेव्हा प्रत्येक ठिकाणचे एक वैशिष्ट्य आहे. त्यामुळे तिथल्या हवामानाला सूट होतील अशी झाडे लावली, तरच पक्षी बसतात. काही झाडांवर पक्षी बसतात. पाणी टंचाईबाबत प्रत्येक आठवड्याला कॅबिनेट मध्ये आढावा घेतला जातो. त्यात सगळी माहिती आलेली असते. याचा आढावा घेतला जातो. टँकाराची गरज लागली तर, तहसीलदारांना सूचना केल्या आहेत. चार टंचाई सद्या जाणवत नाही. मात्र , पाणी टंचाई आहे. यंदाच्या वर्षी १०३ टक्के पाऊस पडेल असा अंदाज आहे. ही समाधानाची बाब आहे. असे मत यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

# बारा दिवसानंतरही पाकिस्तानवर ठोस कारवाई नाही

## खासदार संजय राऊत यांची पत्रकार परिषदेत सरकारवर टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बारा दिवस होऊन गेल. आमचे २७ लोक दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मारले गेले. याला बारा दिवस झाले आणि बदला काय घेतला? रोज बातम्या येतात, या नाड्या आवळल्या, त्या नाड्या सोडल्या, २१ यूट्यूब चॅनल बंद केले पाकिस्तानचे, पाकिस्तानच्या हाय कमिशन मधले मधला स्टाफ कर्मचारीवर्ग कमी करा याला बदला घेणं म्हणतात का? बारा दिवसानंतरही पाकिस्तानवर ठोस कारवाई करण्यात आली नाही, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी सरकारवर केली.

यावेळी ते म्हणाले की, तुम्ही तुमच्या राजकीय विरोधकांचा बदला कसा घेता? त्यांचे पक्ष फोडता, त्यांना तुरुंगात टाकता, त्यांचे आयुष्य उध्वस्त करता, त्यांच्या कुटुंबाचा छळ करतात. पाकिस्तानच्या बाबतीत या नाड्या आवळल्या, त्या नाड्या आवळल्या, एअर स्पेस बंद केले, याला बदला म्हणतात का?, २७ लोक मारले गेल्यावर बदला कसा पाहिजे. इंदिरा गांधींचा इतिहास पाहा. त्यांना नेहरू आणि इंदिरा गांधींचा त्रास होतो. हे कोणाला मूर्ख बनवत आहेत? प्रधानमंत्री फिरत आहेत. इकडून तिकडे तिकडून इकडे, मिठ्या मारत आहेत. लोकांना याला बदला घेणं म्हणत नाहीत.भीती वाटते मला या देशाची आता. अशा प्रकारचे राज्यकर्ते या देशात असतील आणि शत्रू इतका समोर माजलेला असेल आणि आमच्या बदलाची पद्धत काय युट्युब चॅनेल बंद करायचे. हे फक्त भाजपच्या विरोधकांना चुन चुन कर मारण्याचा प्रयत्न करत आहेत. तेही आता शक्य नाही. बारा दिवस झाले तरी हे बदला घेत आहेत आणि आता हे युद्ध सराव करत आहेत. लाडकी बहीण योजना बंद झालेली आहे. आता पाचशे रुपये देत आहेत, १५०० वरून ५०० वर आले. प्रचारात २१०० रुपये देण्याचे बोलले होते. अजित पवार बोलत होते मी नाही बोललो कर्जमाफी मी कुठे बोललो? सरकार तुमचे आहे. तुम्ही त्या सरकारमध्ये आहात. तुम्ही उपमुख्यमंत्री आहात. - प्रत्येक मंत्री बोलत आहेत.माझा पैसा, माझा पैसा...



तुमचा पैसा कुठला? एक मंत्री आहेत. माझ्या खात्याचा पैसा वळवला, लाडक्या बहिणींना दिला ना? तुम्हाला कशाला पाहिजे पैसा? लाडक्या बहिणींना तुम्ही पैसे दिले म्हणून तुम्ही रडत आहात. आधी कसे हसत होतात. मत पाहिजे म्हणून खिशातला पैसा वळवला का? सरकारी पैसा आहे. याचा अर्थ तुम्ही लाडक्या बहिणींना देखील फसवत आहात. तुमचे जे सामाजिक विभागाचे जे कार्य आहे. त्याची फसवणूक करत आहेत.चोऱ्या माऱ्या लांड्या लबाड्या करून निवडणुका जिंकण्यासाठी ही पाकीट मारी केली होती आणि आता ही पाकीट मारी करणे सोपं नाही.

अजित पवार तिकडे बसलेले आहेत. खंबीर. अजित पवार एक अर्थमंत्री म्हणून खमक्या माणूस आहे, आम्ही पाहिलेले आहे. अर्थ खात्याला आणि देशाला आर्थिक शिस्त लावणे याला जर शकुनी म्हणत असाल तर, सध्याची तुम्ही लूटमार करून सत्तेवर आलेले आहेत. त्याला काय म्हणायचे दुर्योधन म्हणायचे का? राजाला आर्थिक शिस्त असेल बेशिस्त असेल तर टिकत नाही. अजित पवार हे उत्तम अर्थमंत्री आहेत. याच्या विषयी काही मी सांगण्याची गरज नाही.अशी बोचरी टीका.खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत सरकारवर केली.

### संक्षिप्त...

#### भिवंडी तालुक्यातील वडपा हद्दीत मुंबईकडून नाशिकच्या दिशेने जाणारा कंटेनर पलटी



**दैनिक आपला विदर्भ**

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी तालुक्यातील वडपा हद्दीत मुंबई-नाशिक महामार्गावरील वडपे येथील कमानी जवळ मुंबईकडून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनर क्रमांक एम एच १९--५००७ सदर कंटेनर चालकाचा तोल जाऊन कंटेनर पलटी होऊन अपघात झाला. या अपघातावरील चालक सुरेंद्र मेवालाल पटेल वय वर्ष २४ किरकोळ जखमी झाला असून, सदर कंटेनर मध्ये काहीतरी तेलकट ऑइल पडून रस्त्यावर पसरले आहे. घटनास्थळी अग्निशामक दलाची, वाहतूक विभागाचे अधिकारी दाखल होते. या रस्त्यावर पाणी मारून मातीचा मारा केला आहे. सदर कंटेनर क्रेनच्या साहाय्याने डिव्हायडेटर वर ठेवला असून, वाहतूक सुरळीत करण्याचे वाहतूक विभागाचे प्रयत्न सुरू आहेत.

#### भीषण अपघातात दोन दुचाकीवरील दोघांचा मृत्यू, परभणीचा उड्डाणपूल बनला मृत्यूचा सापळा

**दैनिक आपला विदर्भ**

**परभणी/प्रतिनिधी :** शहरात असलेल्या उड्डाणपुलावर शनिवारी (दि.३) रात्री नऊच्या सुमारास भरधाव वेगाने धावर्णाया दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. त्यात एका दुचाकीवरील तीघे व दुर्सया दुचाकीवरील दोघे असे पाच जण जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या दोघांना सरकारी दवाखान्यात दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये स्वप्निल सत्यप्रेम लहाने (वय ३१) आणि कृष्णा दिलीप जगताप पुंगळेकर (वय २५) या दोन दुचाकीस्वारांचा समावेश आहे.

शहरातून बाहेर पडताना गंगाखेड नाका परिसरात असलेल्या उड्डाणपुलावर सातत्याने अपघात होतात. गेल्या वर्षभरात अनेक जणांचा या उड्डाणपुलावर मृत्यू झाला आहे. गंगाखेडकडून येणारी वाहने याच पुलावरून येतात तर जिंतूर तसेच सेलू ,पाथरीकडून येणारी वाहनेही याच पुलावरून शहरात येतात. या पुलावर प्रचंड गर्दी असते. शनिवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकीस्वार भरधाव वेगाने परस्परविरोधी दिशेने जात होते. स्वप्निल लहाने हा उड्डाणपुलावरून बसस्थानकाकडे येत होता तर कृष्णा जगताप हा गंगाखेड रस्त्यावरील क्रांतीनगरात आपल्या घराकडे जात होता. त्यावेळी या दोन्ही दुचाकी एकमेकांवर आदळल्या. त्यात एका दुचाकीवरील तीघे व दुर्सया दुचाकीवरील दोघे रस्त्यावर कोसळले. त्यातील दोघांना मोठा मार लागला. दोन्ही दुचाकींचेही मोठे नुकसान झाले.

अपघातस्थळी मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला. या ठिकाणी बराच काळ वाहतूक खोळंबली. प्रत्यक्षदर्शीपैकी काहींनी धाव घेवून गंभीर जखमींना जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र यातील दोन गंभीर जखमींचा जागेवरच मृत्यू झाला.

#### पीएम किसानच्या २० व्या हप्त्यासाठी नवीन अट! हे डॉक्युमेंट नसल्यास मिळणार नाही २,००० रुपये

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेली 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' योजना आता अधिक पारदर्शक आणि प्रभावी करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. या योजनेचा २० वा हप्ता जून २०२५ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. मात्र यावेळी केंद्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून, फक्त 'फार्मर आयडी' असलेल्या शेतकऱ्यांनाच हा हप्ता मिळणार आहे.

काय आहे फार्मर आयडी?

फार्मर आयडी म्हणजे शेतकऱ्याची ओळख पटवणारा एक विशिष्ट क्रमांक, जो डिजिटल स्वरूपात तयार केला जातो. सरकार शेतकऱ्यांची माहिती एका केंद्रीकृत डेटाबेसमध्ये संकलित करत आहे आणि प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक आयडी दिला जातो. या आयडीमध्ये शेतकऱ्याचे नाव, आधार क्रमांक, शेतीचे क्षेत्रफळ, पीक पद्धती, बँक खाती आणि इतर माहिती समाविष्ट असते.

का घेतला निर्णय?

सरकारच्या माहितीनुसार, आतापर्यंत पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये अनेक अपात्र व्यक्तींचा समावेश झाल्याचे उघड झाले आहे. यात शेतजमीन नसलेले, करदाते, संस्थात्मक जमीनधारक, सरकारी कर्मचारी यांचा समावेश होता. यामुळे योजनेचा योग्य लाभ खऱ्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नव्हता. आता 'फार्मर आयडी'च्या अटीनंतर, अपात्र व्यक्ती या योजनेपासून आपोआप वगळल्या जातील,आणि खरे लाभार्थीच यात सहभागी राहतील.

२० वा हप्ता केव्हा मिळणार?

योजनेचा २० वा हप्ता जून २०२५ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. नेहमीप्रमाणे, पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २,००० रु थेट जमा होणार आहेत. पण यावेळी फक्त फार्मर आयडी लिंक केलेल्या खात्यांनाच पैसे मिळणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपली माहिती पीएम किसान पोर्टलवर अद्ययावत करावी, आणि फार्मर आयडी जनरेट केला आहे का याची खात्री करावी.

## विविध वृत्त...

### एमडीची खरेदी-विक्री करणाऱ्या तीन आरोपींना मानकापूर पोलिसांनी केली अटक



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** एमडीची खरेदी-विक्री करणाऱ्या तीन आरोपींना मानकापूर पोलिसांनी अटक केली असून, २० ग्रॅम एमडीसह, रोख आणि दुचाकी वाहन असा एकूण चार लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वसीम अहमद खान, कार्तिक बिडवाड आणि आयुष मेश्राम असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मानकापूर परिसरात बुद्धविहाराजवळ एमडी पावडरची खरेदी-विक्री होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तिथे धाड टाकली असता एमडी पावडरची विक्री करणारा आयुष मेश्राम याला ताब्यात घेतले. त्याची अंग झडती घेतली असता त्याच्याजवळ २० ग्रॅम एमडी ड्रग्स मिळून आले. तर खरेदी करणारे वर्धा येथून आलेले दोन जण याच्याजवळ रोख रक्कम मिळून आली. त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २० ग्रॅम एमडी सह दोन दुचाकी रोख रक्कम असा चार लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या आरोपीने एमडी कुठून आणले याचा शोध आता पोलीस करत आहे.

### केंद्रीय आयुष मंत्रांनी घेतली जैन कुटुंबीयांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्लच्याच्या वेळी पहलगाम येथे असलेल्या व बुलडाणा येथे सुखरूप परत आलेल्या पारस व ऋषभ जैन यांची केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी त्यांच्या समवेत गर्दे वाचनालयाचे सचिव उदय दादा देशपांडे, माजी नगरसेवक मंदार बाहेकर, सेवानिवृत्त शिक्षक सुरेश जैन, विकासराव खक्के, पत्रकार अरुण जैन, युवराज वाघ, बाळू जाधव आदी उपस्थित होते. मंत्री महोदयांनी या दोन्हीही तरुणांसोबत जम्मू काश्मीरमधील परिस्थिती, घटनेच्या वेळी असलेले वातावरण, पर्यटनाचा अनुभव या संदर्भात चर्चा व विचारपूस केली.

### पत्नीचे तिच्या मावस भावासोबत संबंध, कट रचून नवऱ्याचा काटा काढला? जळगाव प्रकरणात मोठी अपडेट

**जळगाव/प्रतिनिधी** : जळगाव शहरातील कालिका माता मंदिराजवळ एका तरुणाची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शनिवारी रात्री उशिरा मारेकऱ्यांनी धारदार शस्त्राने तरुणाला भोसकलं आहे. हा हल्ला इतका भयंकर होता की, तरुणाचा जागीच मृत्यू झाला. अत्यंत गजबजलेल्या कालिका मंदिर परिसरात ही हत्या झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. तरुणाच्या हत्येम ागे त्याच्या पत्नीचे तिच्या मावस भावासोबतचे अनैतिक संबंध असल्याचा आरोप होत आहे.

जळगाव शहरातील कालिंका माता मंदिर परिसरात एका हॉटेलजवळ गुरुवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास एका तरुणाची हत्या झाली. आकाश पंडित भावसार (वय ३०) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून, पत्नीच्या नातेवाईकांनीच त्याचा खून केल्याचा आरोप मृताच्या कुटुंबीयांनी केला आहे.

पत्नीचे अनैतिक संबंध असल्याचा आरोप...

मृत आकाश भावसारच्या पत्नी पूजा हिचे तिच्या सख्या मावस भावासोबत अनैतिक संबंध होते, असा गंभीर आरोप आकाशच्या आई, बहिण व मेव्हणे यांनी केला आहे. याच नात्यातून खुनाचा कट आखण्यात आला, असल्याचा दावा त्यांनी केला.

हत्या झाल्यानंतर आकाशच्या कुटुंबीयांनी आक्रमक भूमिका घेत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही आणि कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे ते म्हणाले.

पूजाच्या मावस भावानेच आकाशचा खून केला असून, त्याला शोधून मारण्यासाठी मारेकरी सकाळीच आकाशच्या मूळ गावात गेले होते. मात्र तो जळगावमध्ये असल्याचे समजल्यावर त्यांनी तिथे जाऊन त्याच्यावर हल्ला केला, असल्याचा आरोप आकाशच्या कुटुंबीयांनी केला आहे.

# बारावीच्या परीक्षेचा निकाल ५ मे रोजी जाहीर होणार

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपद्धतीनुसार सोमवार दि. ५ मे, २०२५ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे, असे मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी जाहीर केले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे. या संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

1) https://results.digilocker.gov.in 2) https://mahahsscboard.in 3) http://hscresult.mkcl.org 4) https://results.targetpublications.org 5) https://results.navneet.com 6) https://www.tv9hindi.com/education/board-exams/maharashtra-board-exams 7) https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-hse-12-results 8) https://www.indiatoday.in/education-today/results आणि 9) https://www.aajtak.in/education/board-exam-results

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण वरील संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल. त्याचप्रमाणे Digilocker app मध्ये Digital गुणपत्रिका संग्रहीत करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच : https://mahahsscboard.in (in college login) या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल, अशी माहिती मंडळाच्या प्रकटनामध्ये देण्यात आली आहे.



## नृसिंह अवताराप्रमाणे ईव्हीएम किंवा बॅलेट पेपरमधून नवा अवतार राक्षसरुपी भाजपाचे खलत्व नष्ट करेल: हर्षवर्धन सपकाळ

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** भक्त प्रल्हादाची जी भक्ती आहे तशीच भक्ती काँग्रेस जनांच्या आचार, विचार आणि उच्चारातून दिसत आहे. आपण काँग्रेस काँग्रेस म्हणत आहोत तर दुसरा रावणाचा छळणारा विचार आहे तो पक्षांतर करा म्हणतो, आमचेच बरोबर आहे हे सांगतो. भक्त प्रल्हादाच्या भक्तीने नृसिंहाचा अवतार झाला तसाच नृसिंह अवतार ईव्हीएम किंवा बॅलेट पेपरमधून होईल आणि राक्षसरुपी भाजपाचे खलत्व नष्ट केल्याशिवाय राहणार नाही, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

सामाजिक सलोखा व सद्भाव वाढीस जावा यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली परभणीत आज सद्भावना पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री नितीन राऊत, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, खा. डॉ. कल्याण काळे, खा. रविंद्र चव्हाण, माजी मंत्री सुरेश वरपुडकर, रमेश बागवे, काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, परभणी शहर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, मोहन जोशी, तुकाराम रेंगे पाटील, प्रदेश सरचिटणीस ब्रिज दत्त, रामचंद्र दळवी, मुजाहिद खान, केदार साळुंके, बाळासाहेब देशमुख, अभय देशमुख यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सकाळी पोखर्णी येथे नृसिंहाचे दर्शन घेऊन सद्भावना पदयात्रेची सुरुवात झाली. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, राज्यात सामाजिक तेढ निर्माण करण्याचे काम केले जात आहे. परभणीतही अशाच एका घटनेने या भागात सामाजिक द्वेष पसरवण्याचा प्रकार झाला. राज्यातील सामाजिक तणाव कमी करण्याच्या हेतूने व सद्भावना आणि सौहार्द निर्माण करण्यासाठी ही काँग्रेस पक्षाने सद्भावना पदयात्रा आयोजित केली आहे. याआधी बीड जिल्ह्यात मस्साजोग ते बीड, नागपूर आणि नाशिकमध्ये सद्भावना पदयात्रा काढण्यात आली तर काल परळीत सद्भावना सत्याग्रह करण्यात आला आणि आज परभणीत सद्भावना यात्रा काढली आहे.

## टोल टॅक्स मधून समृद्धी महामार्गावर प्रवाशांचा अपघाती विमा काढा

दैनिक आपला विदर्भ

### माजी मंत्री सुबोध सावजी यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**डोणगाव/प्रतिनिधी :** मुंबई -नागपूर समृद्धी महामार्गावरील अतिरेकी महामार्गाचा बंदोबस्त करून प्रवाशाने प्रवास सुरू केलेल्या टोल नाक्यावर प्रवाशाचा अपघाती विमा आपोआप निघालवा, याबाबत निर्णय घेऊन प्रवाशांना विमानाच्या सुरक्षा कवच प्रदान करावे अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुंबई नागपूर हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी मार्ग हा प्रवासा करिता अतिरेकी झालेला आहे.आतापर्यंत या महा मार्गावर जवळपास ५०० चे वर बळी गेलेले आहेत.या महामार्गावर अनेक वाहने निकामी झालेले आहेत. या मार्गावर अजून किती बळी जातील व वाहने निकामी होतील हे सांगता येत नाही. अतिरेकी महामार्गाचा त्वरित बंदोबस्त करावा, नव्याने



सुरू झालेल्या समृद्धी महामार्गावर पाचशेच्या बळी जाणे ही संख्या खूप मोठी आहे आणि आपल्या राज्याला हे लांचन आहे. या महामार्गावर आपण टोल टॅक्स वाढवलेला आहे. या टोल टॅक्स मधून प्रवाशाने प्रवास सुरू केलेल्या टोल गेटवरच प्रवाशाचा अपघाती विमा निघाला पाहिजे अशी व्यवस्था करावी. अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## कब्बडी स्पर्धेत देशभरातील खेळाळू सहभागी होणार

### रामदास तडस आणि पंकज भोयर यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील देवळीमध्ये राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा होणार आहेत.देवा भाऊ कब्बडी स्पर्धा नावाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.मी फेडरेशनचा अध्यक्ष झाल्यानंतर पाहिल्यांदाच स्पर्धा होत आहेत. देशभरातील २७ राज्यातील खेळाळू सहभागी होणार आहेत.तर,मुख्यमंत्री बक्षीस वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.अशी माहिती रामदास तडस व राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी माहिती देताना राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की,९ ते १२ मे देवा भाऊ राष्ट्रीय कबड्डी सामने वर्धा जिल्ह्यात होणार आहेत. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कब्बडी खेळली जाते. मात्र, त्याला राष्ट्रीय स्थरावर महत्व दिले जावे, यासाठी





आयोजन करण्यात येत आहे. कबड्डीचे जास्तीत जास्त खेळाळू तयार व्हावे, कबड्डी खेळ लोप पावू नये, यासाठी आम्ही प्रयत्न करतो. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तेव्हापासून खेळांना सुद्धा महत्व आले आहे. ही स्पर्धा मॅटिंग वर राहणार असून सगळ्या जिल्ह्यात कबडी साठी मॅटिंग उपलब्ध करून देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. ही इंटर स्टेट स्पर्धा असणार आहे.

एआयटी संदर्भात मागणी करण्यात येत आहे. यावर मुख्यमंत्री निर्णय घेतील. मात्र, आयुक्त लेव्हलवर याची चौकशी सुरू आहे.सायबर गुन्हेगारी हा आमच्यासमोर मोठा विषय आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस लक्ष ठेऊन आहेत. विदर्भ पेट्रोल असोशियशनने जो डिजिटल पेमेंट बंद करण्याचा निर्णय घेतला त्यावर तोडगा निघेल त्यांचा संप आम्ही होऊ देणार नाही. नागपूर उपराजधानी आहे. नागपुरातील परिस्थितीवर देवेंद्र फडणवीस लक्ष ठेऊन आहेत. नागपुरात पहिल्यांदा दंगल झाली होती. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले. नागपुरात हत्या सत्र सुरू आहे, त्यावर कंट्रोल करण्याचे काम पोलीस करत आहेत.अशी माहिती राज्यमंत्री पंकज भोयर व रामदास तडस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## योग्य पुनर्वसनाशिवाय इमारती रिकाम्या करु देणार नाही – राज ठाकरे

**मुंबई/प्रतिनिधी** : प्रभादेवी पुलालगतच्या १९ इमारतींमधील सर्व रहिवाशांचे योग्य पुनर्वसन झाल्याशिवाय घरे, इमारती रिकाम्या करु देणार नाही, असा इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकार आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) दिला आहे. तुमची घरे तोडायला येतील त्यांना राज ठाकरेंशी बोलणे झाले आहे असे सांगा असे म्हणत राज ठाकरे यांनी योग्य पुनर्वसनाशिवाय प्रभादेवी पूल बंद करून त्याचे पाडकाम होऊ न देण्याची ठाम भूमिका घेतली आहे. लवकरच प्रभादेवीलगतच्या बाधित १९ इमारतीतील रहिवासी राज ठाकरे यांनी भेट घेऊन आपल्या व्यथा मांडणार आहेत.अटल सेतूला जोडणाऱ्या शिवडी-वरळी उन्नत रस्त्याअंतर्गत मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील सध्याचा १२५ वर्ष जुना प्रभादेवी पूल पाडून त्याजागी नवीन द्विस्तरीय पूल बांधला जाणार आहे. त्यानुसार पूल बंद करून पुलाचे पाडाकम करणे आणि त्या जागी नवीन पूल बांधण्यासाठी मुंबई वाहतूक पोलिसांनी एमएमआरडीएला ना हरकत प्रमाणपत्र दिले होते. त्यानुसार २५ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता पूल वाहतुकीसाठी बंद होणार होता. मात्र पुनर्वसनाच्या मुद्यावरुन उन्नत रस्ता प्रकल्पात बाधित होणाऱ्या १९ इमारतीतील रहिवाशांनी पूल बंद होऊ दिला नाही आणि पुलाचे पाडकाम रखडले.

# चोरी झालेली २२ लाख रुपयांची मालमत्ता फिर्यादीला परत, चोरट्याला भंडारा शहर पोलिसांनी केली अटक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शहरातील शास्त्रीनगर परिसरात झालेल्या मोठ्या चोरीच्या घटनेचा पर्दाफाश करतानाच भंडारा पोलिसांनी चोरट्याकडून जप्त केलेली २२ लाख रुपयांची मालमत्ता फिर्यादीला परत करून कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शास्त्रीनगर येथील महेश सुरेश मंत्री (४१, रा. शास्त्रीनगर) हे ४ फेब्रुवारी रोजी कुटुंबासह शहराबाहेर गेले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले १० लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि १८ लाख रुपयांची रोकड असा २८ लाखांचा ऐवज चोरून नेला. या घटनेच्या तक्रारीवरून भंडारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.





पोलिसांनी तत्परता दाखवली आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपी रोशन सेवकदास मेश्राम (रा. गिट्टीखदान, नागपूर) याला दोन दिवसांत अटक करण्यात आली. चौकशी व कारवाई दरम्यान आरोपींकडून चोरीचे सोन्या-चांदीचे दागिने (अंदाजे १० लाख रुपये) आणि रोख १२,२६,६१० रुपये जप्त करण्यात आले. या प्रकरणात न्यायालयाने जप्त केलेली मालमत्ता फिर्यादीला परत करण्याचे आदेश दिले. यानंतर अतिरिक्त पोलीस अधीक्षक व प्रभारी पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या उपस्थितीत भंडारा पोलीस ठाण्यात महेश मंत्री यांच्याकडे त्यांची मालमत्ता सुपूर्द करण्यात आली.